**डॉ. अविनाश ढाकणे,** भाप्रसे
सदस्य सचिव
**Dr. Avinash Dhakne,** IAS
MEMBER SECRETARY

महाराष्ट्र
"Your Service is our Duty"

# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

## MAHARASHTRA POLLUTION CONTROL BOARD

**क्र. मप्रनि/ ससं(जप्रनि) /२५०८२६-एफटीएस-** ०११९ **दिनांक : २६.०८.२०२५.**

### प रि प त्र क

विषय :- ६ फुटापेक्षा कमी उंची असलेल्या पर्यावरणपुरक मूर्त्यांचे इतर पर्याय उपलब्ध नसल्यास नैसर्गिक जलस्त्रोतात विसर्जन करण्याबाबत .....

संदर्भ : १. मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दि.२४.०७.२०२५ रोजी जनहित याचिका क्र. ९६/२०२४ मध्ये पारित केलेले आदेश
२. दि.०१.०८.२०२५ रोजीचा पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन यांचा मूर्ती विसर्जनाबाबतचा शासननिर्णय.
३. पर्यावरणपूरक उत्सव साजरे करण्याबाबत स्थापन केलेल्या तांत्रिक उपसमितीची दि.२५.०८.२०२५ रोजी आयोजित केलेली १० बैठक.

पर्यावरण पुरक उत्सव साजरे करण्याबाबत दिनांक २५.०८.२०२५ रोजी म.प्र.नि.मंडळाच्या मुख्यालयात तज्ञ उपसमितीची १० वी बैठक आयोजित करण्यात आली होती.

मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दि.२४.०७.२०२५ रोजी जनहित याचिका क्र. ९६/२०२४ मध्ये आदेश पारित केले आहेत. पर्यावरण विभागाने प्लास्टर ऑफ पॅरिस (पीओपी) मूर्ती विसर्जनाबाबत मार्गदर्शक सूचना दि.०१.०८.२०२५ रोजीच्या शासननिर्णयानुसार, निर्गमित करण्यात आलेले आहेत. या मार्गदर्शक सूचना सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांना कळविण्यात आलेल्या आहेत. काही स्थानिक स्वराज्य संस्थांनी व नागरिकांनी ६ फुटापेक्षा कमी उंची असलेल्या पर्यावरणपूरक मूर्तींचे विसर्जनाबाबत म.प्र.नि.मंडळाकडे विचारणा केलेली आहे.

सदर बाबत सर्व तज्ञ सदस्यांची चर्चा झाली. पाण्याचे स्त्रोत खराब होऊ नये, यासाठी खालीलप्रमाणे सुचना निर्गमित करण्यात येत आहेत :-

पर्यावरणपूरक मूर्तीचे विसर्जन सुध्दा शक्यतोवर कृत्रिम तलावात करावे, मात्र ज्या ठिकाणी अशा प्रकारची व्यवस्था उपलब्ध नाही, त्या ठिकाणी सदर पर्यावरणपूरक मूर्तींचे विसर्जन नैसर्गिक स्त्रोतात करण्यास हरकत नाही. मात्र विसर्जित झालेल्या मूर्तींचा पुर्नवापर करण्याबाबतच्या सूचना दि.०१.०८.२०२५ रोजीच्या शासननिर्णयाप्रमाणेच कायम राहतील.

(डॉ.अविनाश ढाकणे, भा.प्र.से.)
सदस्य सचिव

प्रत सादर,

१. मा.सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. मा.संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, नवी मुंबई.